# डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल 2019-2020

---

### डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनीने पटकावला चषक

दिनांक:-12/06/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेची विद्यार्थिनी चेतना गौतम हिने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे झालेल्या आव्हान 2019 या कॅम्पमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत सहभाग घेतला होता. या कॅम्पमध्ये महाराष्ट्रातील 38 विद्यापीठातील 1236 विद्यार्थांनी सहभाग घेतला होता. या कॅम्पचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी केले. एन. डी. आर. एफ. चे मेजर राणा प्रताप, नांदेड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, रा. से. यो. चे संचालक मंचावर उपस्थित होते. आपत्ति व्यवस्तपणावर आधारित या कॅम्पमध्ये प्रत्यक्ष कृती व प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण देण्यात आले होते. या कॅम्पमध्ये उत्कृष्ट करी करून चेतना गौतम हिने प्रथम क्रमांक पटकावून नागपूर विद्यापीठात मानाचे स्थान मिळवून दिले.



### आंतरराष्ट्रीय योग दिवस

दिनांक:-21/06/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे प्राचार्य आर. व्ही. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा विभागातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी, रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांच्या सह महाविद्यालयातील प्राध्यापक व 120 विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे व आभार डॉ. दीपक बोरकर यांनी मानले.








# महावृक्षदिंडी

दिनांक:- 02/07/2019

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक 02/07/2019 ला महावृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या वृक्षदिंडीला कुलगुरू डॉ. सिद्धार्थ विनायक काने यांनी हिरवी झेंडी दाखविली या वृक्षदिंडीत डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे व रा. से. यो. च्या 30 विद्यार्थांनी सहभाग घेतला होता. रा. तु. म. नागपूर विद्यापीठाच्या नवीन इमारतीच्या परिसरात वृक्ष लावण्यात आले होते.

केले.











# वृक्षारोपण

दिनांक:- 10/07/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षदिंडीचे व वृक्षारोपणाचा कार्यक्रम 10/07/2019 ला महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आला. या वृक्षदिंडीत महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील, उपप्राचार्या डॉ. प्रतिभा सिरिया, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत व 220 विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यानंतर परिसरात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थांनी विविध प्रजातीच्या वृक्षाचे रोपण केले.










## पु. ल. देशपांडे स्टँड अप कॉमेडी स्पर्धा

दिनांक:-30/07/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील दादासाहेब कुंभारे सभागृहात महाराष्ट्राचे लाडके लेखक पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्य स्टँड अप कॉमेडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील तर परीक्षक म्हणून अभिनेते देवेंद्र दोडके, नाट्य अभिनेते व दिग्दर्शक शशांक केवले. डॉ. सतीश पावडे या स्पर्धेच्या नागपूर जिल्ह्याचे समन्वयक डॉ. रवींद्र तिरपुडे उपस्थित होते.

या स्पर्धेत पु. लं. च्या साहित्यावर आधारित अभिनयाद्वारे स्पर्धकांनी कॉमेडी प्रस्तुत केली. या कार्यक्रमाला जवळपास 350 विद्यार्थी, प्राध्यापक व नागपूर जिल्ह्यातील विविध भागातून आलेले स्पर्धक उपस्थित होते.








# अण्णाभाऊ साठे जयंती

दिनांक:- 01/08/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 01/08/2019 ला अण्णाभाऊ साठे जयंती निमित्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली महावियालयातून अण्णाभाऊ साठे चौकातील अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. या रॅलीमध्ये महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. प्रतिभा सिरिया, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत, प्रा. राहुल मून आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे 110 विद्यार्थी सहभागी झाले होते.




# स्वातंत्र दिन

दिनांक:-15/08/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालयात स्वातंत्र दिन साजरा करण्यात आला. ध्वजारोहन परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे 250 विद्यार्थी सहभागी झाले होते.










## लेखन वाचन कार्यशाळा

दिनांक:-19/08/2019

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत जेष्ठ संगीतकार सुधीर फडके, विख्यात कवि, पटकथा, संवाद लेखक व गितकार ग. दि. माडगूळकर आणि नाट्य चित्रपट अभिनेते विनोदी लेखक पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षांनीमित्याने डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे लेखन, काव्य, व संगित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत रा. से. यो. च्या 70 विद्यार्थांनी सहभाग घेतला होता.


















## एन.एस.एस. चे उद्‌घाटन

दिनांक:- 21/08/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या नव्या सत्राचे उद्‌घाटन गुन्हे शाखेचे उपायुक्त नीलेश भरणे यांच्या हस्ते दिनांक 21/08/2019 ला सकाळी 10 वाजता करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील, प्रमुख मार्गदर्शक म्हणून रा. तु. म. नागपुर विद्यापीठातील रा. से. यो. चे संचालक डॉ. केशव वाळके, भुपेश पाटील, प्रा. दीपककुमार खोब्रागडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत व रा. से. यो. चे 300 विद्यार्थी उपस्थित होते.


Unnamed Road, Ramdaspeth, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
29°C
84°F
2019-08-21(Wed) 10:54(AM)


NSS
SERVICE SCHEME
Unnamed Road, Ramdaspeth, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
29°C
84°F
2019-08-21(Wed) 10:55(AM)













वर्धा सेवाग्राम अभ्यास दौरा

दिनांक:- 04/09/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांचा अभ्यास दौरा वर्धा येथील सेवाग्राम, गांधी आश्रम, विनोबा भावे आश्रम, शांति स्तूप येथे नेण्यात आला होता. विद्यार्थांच्या जीवनात समता, स्वातंत्र, बंधुता सामाजिक न्याय, सत्य, अहिंसा व शांतिच्या मार्गाचा अवलंब करून जिवण अधिक समृद्ध करण्यासाठी विद्यार्थांना प्रोत्साहित करणे हा उद्देश डोळ्यापुढे ठेवून या सहलीचे आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत यांनी केले. या सहलीत 110 विद्यार्थी सहभागी झाले होते.






## गणपती विसर्जन निर्माल्य गोळा करणे

दिनांक:- 12/09/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या 50 विद्यार्थांनी सोनेगाव तलाव येथे गणपती विसर्जनानीमित्या निर्मल्य संकलनात सहभाग गेटला होता. भाविकांतर्फे फेकून देण्यात येणारे निर्माल्य संकलित करून परिसर स्वच्छ केला. डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांनी हा उपक्रम राबविला.




## व्यसनमुक्ती अभियान

दिनांक:- 16/09/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक तंबाखू विरोधी दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपूडे, डॉ. दीपा पान्हेकर, डॉ शैलेश बहादुरे, डॉ. रत्नदीप सावंत उपस्थित होते.

मान्यवरांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. व विद्यार्थांनी पथनाट्य, पोस्टर, व आमली पदार्थ निषेधावर चित्रे काढून त्याचे प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे 130 विद्यार्थी उपस्थित होते.





## NSS स्थापना दिवस

दिनांक:- 29/09/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेचा स्थापना दिवस दिनांक 29/09/2019 ला साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील, प्रमुख वक्ते म्हणून डॉ. नरेंद्र भुसारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य श्री. विलसजी गजघाटे, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत मंचावर उपस्थित होते. मान्यवरांनी देशाला समृद्ध बनविण्यासाठी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला 300 विद्यार्थी उपस्थित होते.















## गांधी जयंती रॅली

दिनांक:- 02/10/2019

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने गांधी जयंती निमित्य संविधान चौक ते विद्यापीठ प्रशासकीय भवनापर्यन्त शांति रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅली मध्ये प्र-कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, रा. से. यो. चे संचालक डॉ. केशव वाळके, आणि विविध महाविद्यालयातील रा. से. यो. चे विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी या रॅलीत सहभागी झाले होते. डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील 40 विद्यार्थांनी यात सहभाग घेतला होता.




## लोकशाहीचा जागर पथनाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक

दिनांक:- 17/10/19

नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय रामटेक, विभागीय प्रशासन रामटेक महाराष्ट्र शासन व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने "लोकशाहीचा जागर" या विषयावर विद्यापीठस्तरीय नाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नागपूर व जिल्ह्यातील विविध महाविद्यालयच्या 130 विद्यार्थांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील रा . से. यो. च्या 15 विद्यार्थांनी सहभाग घेतला व प्रथम क्रमांकाचे परितोषिक पटकाविले.




दिनांक:- 07/10/2019

दरवर्षीप्रमाणे डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या 250 विद्यार्थांनी 6 व 7 आक्टोंबर 2019 ला दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिवस साजरा करण्यात आला. या पावन भूमीवर जगभरातून लाखो अनुयायी येत असतात. त्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास व गैरसोय होऊ नये म्हणून रा. से. यो. चे विद्यार्थी दोन दिवस दीक्षाभूमी परिसरात आपली सेवा देतात. व पथनाट्याच्या द्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार पटवून देण्यात प्रयत्न करतात.






## मतदान जनजागृती पथनाट्य

दिनांक:-16/10/2019

जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर च्या वतीने दिनांक 16/10/2019 ला मतदान जनजागृती मोहीम राबवली होती. त्यांनी डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या 30 विद्यार्थांचे दोन पथक तयार करून या दोन्ही पथकांनी शहरातील विविध भागात पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती केली.






## संविधान दिवस साजरा

दिनांक:- 26/11/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील रा. से. यो. च्या वतीने 26 नोव्हेंबर 2019 ला दीक्षाभूमी परिसरात संविधान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य डॉ. सुधिर फुलझेले, प्राचार्य आर. व्ही. पाटील, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे व रा. से. यो. चे 160 विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. सुधिर फुलझेले यांनी विद्यार्थांना संविधान प्रास्ताविकेचे वाचन करून शपथ दिली.









## जागतिक एड्स दिवस

दिनांक:- 30/11/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक 30 नोव्हेंबर 2019 ला जागतिक एड्स दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील, प्रमुख मार्गदर्शक म्हणून मेजर डॉ. मिलिंद भ्रशुंडी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य श्री. विलासजी गजघाटे, कार्यक्रम अधिकारी डॉ. रविंद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत उपस्थित होते. डॉ. भ्रशुंडी यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन करतांना लैंगिक संबंध माणसाची मूलभूत गरज आहे. परंतु प्रत्येक विद्यार्थांनी या विषयी जागृत असले पाहिजे. असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाला 180 विद्यार्थी सहभागी झाले होते.







# महापरिणीर्वण दिन

दिनांक:-06/12/2019

प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या वतीने दीक्षाभूमी परिसरात 06 डिसेंबर 2019 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले होते. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरेई ससाई, स्मारक समितीचे सदस्य डॉ. सुधिर फुलझेले, श्री. एन. आर. सुटे, श्री. विलासजी गजघाटे, प्राचार्य आर. व्ही. पाटील, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे महाविद्यलायचे सर्व प्राध्यापक व कर्मचारी व रा. से. यो. चे 200 विद्यार्थांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.





## वॉकथॉन स्पर्धा

दिनांक:-15/12/2019

राष्ट्रीय मेंदू आरोग्य सप्ताह दिन जागृतीचे आयोजन ऑरेंगे सिटी कल्चरल फाउंडेशन, इंडियन अकादमी ऑफ न्यूरोलॉजी, नागपूर न्यूरो सोसायटी, नागपूर महानगर पालिका सायट्रिक सोसायटी ऑफ नागपूर, सप्तक डॉ. आंबेडकर स्पोर्ट्स अकादमी व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने वॉक फॉर युवर ब्रेन हा संदेश केंद्रस्थानी ठेऊन वॉकथॉन स्पर्धा 15 डिसेंबर 2019 लासकाळी 6.00 वाजता घेण्यात आली. वॉकथॉनला विभागीय आयुक्त डॉ. संजीवकुमार अल्पसंख्याक आयोगाचे प्रधान सचिव डॉ. श्याम तायडे, महापालिका उपायुक्त राजेश मोहिते, बसोलीचे चंद्रकांत चन्ने, नरेंद्र सनेजा, डॉ. चंद्रशेखर मेश्राम, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे उपस्थित होते. शहरातील 10 वर्षे वयोगटापासून ते 80 वयोगटापर्यंतच्या मुले-मुली, तरुण, म्हातारे अशा 300 व रा. से. यो. च्या 110 विद्यार्थांनी यात सहभाग घेतला होता.





राष्ट्रीय युवा दिवस युवा गिरी

दिनांक:-11/01/2020

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रा. तु. म. नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर “युवागिरी” या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक 11 जानेवारी 2020 ला करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील 60 विद्यार्थांनी सहभाग घेतला होता.





# युवा दिवस

दिनांक:- 13/01/2020

आजची तरुणाई हे देशाचे भविष्य आहे या तरुणाईने आपल्या ज्ञानाच्या जोरावर देशाला बळकट करण्याचे काम केले आहे. त्यामुळे स्वामी विवेकानंदाचे व्यक्तिमहत्व आजच्या तरुणांना प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन प्राचार्य आर. व्ही. पाटील यांनी केले. डॉ. आंबेडकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 12 जानेवारी 2020 ला स्वामी विवेकानंद जयंती "युवादिवस" म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत यांनी सर्व विद्यार्थांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला रा. से. यो. चे 185 विद्यार्थी सहभागी झाले होते.













## स्वच्छता शपथ

दिनांक:-16/01/2020

स्वच्छता पखवाडा साजरा करण्याच्या उद्देशाने दिनांक 16 जानेवारी 2020 ला महाविद्यालयाच्या प्रांगणात प्राचार्य आर. व्ही. पाटील यांनी विद्यार्थांना स्वच्छतेवर शपथ दिली. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. अर्चना मेश्राम, डॉ. भोंगाडे, प्रा. सुजित चव्हाण व रा. से. यो. चे 160 विद्यार्थी उपस्थित होते.










## स्वच्छतेवर वकृत्व स्पर्धा व पोस्टर स्पर्धा

दिनांक:- 20/01/2020

महाविद्यालयातील दादासाहेब कुंभारे सभागृहात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान या विषयावर वकृत्व स्पर्धा व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाल महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर रेवतकर, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. बोरीकर, डॉ. रत्नदीप सावंत व रा.से.यो. चे 210 विद्यार्थी उपस्थित होते.








## परिसर स्वच्छता अभियान

दिनांक:- 21/01/2020

डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचा व दीक्षाभूमीचा परिसर स्वच्छ करून स्वच्छता अभियानाची सुरुवात 21/01/2020 ला करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचे 120 विद्यार्थी, प्राचार्य आर. व्ही. पाटील, उपप्राचार्य डॉ. किशोर रेवतकर, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने हाहात झाडू घेवून परिसर स्वच्छ केला.








# गणतंत्र दिवस

दिनांक:-26/01/2020

26 जानेवारी 2020 ला भारतीय गणतंत्र दिवस साजरा करण्यात आला. प्राचार्य आर. व्ही. पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. या कार्यक्रमाल महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.





## पाण्याचे नियोजन व महत्व संदेश रॅली

दिनांक:- 28/01/2020

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 28 जानेवारी 2020 ला पाण्याचे नियोजन व महत्व जनतेला पटवून देण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांच्या नेतृत्वात रॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीचा शुभारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. विद्यार्थांनी लक्ष्मीनगर, धरमपेठ, काचीपुरा या भागातून पाण्याच्या महत्वावर घोषणा देत या रॅलीचे समापन महाविद्यालयात केले. या रॅलीमध्ये रा. से. यो. चे 140 विद्यार्थी सहभागी झाले होते.







## डॉ. आंबेडकर महाविद्यालयात महिला दिवस साजरा

दिनांक:-08/03/2020

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना व महिला विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील, महिला विकास मंचाच्या डॉ. वर्षा पानबुडे, डॉ. भुवनेश्वरी मेहेरे, डॉ. प्रज्ञा भेलवा, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांनी महिला दीनानिमित्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या 60 विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.




## डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नागपूर येथील विविध भागात गरीब लोकांना जेवण वाटप

दिनांक:-02/04/2020

2 एप्रिल पासून काही दिवस काही गरजू 100-200 लोकांना ज्यांना खरच खायला 1 वेळचे जेवण सुद्धा मिळत नाही. त्यांना 9 एप्रिल पर्यत वडधामना, वाडी, रवी नगर, होऊन, बसस्टँड, रेल्वे स्टेशन, मेडिकल हॉस्पिटलमध्ये व रस्त्यावर काही लोकांना जेवण, बिसलेरी, बिस्कीट दिले, तसेच मास्क, व लोकांना सतर्क राहण्याची सुचना व माहिती दिली.







“COVID 19” प्रश्नमंजुषा 2020”

दिनांक:- 07/05/2020

डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक 07/05/2020 ला “COVID 19” या विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विविध महाविद्यालयातील जवळपास 1000 विद्यार्थांनी सहभाग घेतला होता. सर्व सहभागी स्पर्धकांना ऑनलाईन प्रमाणपत्र पाठविण्यात आले.

**Covid-19 National Online Quiz Competition**
Welcome to Participate in Online...
docs.google.com

Dr.Ambedkar College, Dikshabhoomi, Nagpur.

"COVID 19" प्रश्नमंजुषा २०२०"
सर्व शिक्षक, शिक्षेकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मित्रांनो डॉ. आंबेडकर कॉलेज,दीक्षाभूमी नागपूर येथील रा. से. यो. (NSS) द्वारे COVID19 चे औचित्य साधून COVID 19 बद्दल आपल्याला काही गोष्टीची माहिती व्हावी किंवा माहिती असेल तर त्याची उजळणी व्हावी यासाठी आम्ही प्रश्नामंजुषेचे आयोजन केले आहे. कृपया खालील लिंक उघडून, प्राथमिक माहिती भरावी व सर्व प्रश्नाचे उत्तर देऊन सादर करावी ही विनंती.

https://forms.gle/ha4L3q9F4Q8sRGVx8

सूचना
1. सर्व प्रश्न सोडवणे बंधनकारक आहे
2. 50 टक्के किंवा अधिक गुण प्राप्त केले त्यांना EMAIL द्वारे प्रमाणपत्र पाठवण्यात येईल.
3. ही प्रश्नमंजुषा 7मे पासून चालू असेल, त्यानंतर लिंक बंद करण्यात येईल.
4. दर दिवसाला १०० प्रमाणपत्र पाठवले जातील,

प्रा.आर.व्ही.पाटील
प्राचार्य
डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर

डॉ. रवींद्र तिरपुडे
कार्यक्रम अधिकारी
रा.से.यो.
डॉ. रत्नदीप सावंत
समन्वयक

9:12 pm

## डॉ. आंबेडकर महाविद्यालयात वृक्षारोपण

दिनांक:-01/07/2020

डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक 01/07/2020 रोजी, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा सिरिया व डॉ. रवींद्र तिरपुडे यांच्या हस्ते वृक्षारोपण महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेचे 10 विद्यार्थी शारीरिक अंतराचे पालन करून उपस्थित होते.










# वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्या

# नव राष्ट्र



## डॉ. आंबेडकर महाविद्यालय

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथे प्रा. आर. व्ही. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालयातील क्रीडा विभागातर्फे करण्यात आले होते. कार्यक्रमाला ए. पी. जोशी, कार्यक्रम अधिकारी रवींद्र तिरपुडे प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाला रत्नदीप सावंत, दीपा पान्हेकर, प्रतिभा सिरीया, शैलेश बहादुरे, वझलवार प्रामुख्याने उपस्थित होते. मोठ्या संख्येने विद्यार्थी कार्यक्रमात सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे व आभार डॉ. दीपक बोरकर यांनी मानले.

Navarashtra Orange City Plus Edition
23 Jun, 2019 Page No. 4

# तरुण भारत

Nagpur Edition | 2019-06-25 | Page- 5

## डॉ. आंबेडकर महाविद्यालय



दीक्षाभूमीवरील डॉ. आंबेडकर महाविद्यालयात प्राचार्य आर. व्ही. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. उपप्राचार्य डॉ. अरविंद जोशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत, डॉ. दीपा पान्हेकर, उपप्राचार्य डॉ. प्रतिभा सिरीया, डॉ. शैलेश बहादुरे, डॉ. वझलवार, डॉ. दीपक बोरकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते. समीर गणवीर यांनी योगासनांचे प्रात्यक्षिक दिले.

Powered by Bharati Web Pvt Ltd

## डॉ . आंबेडकर महाविद्यालय



डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालयातील क्रीडा विभागातर्फे करण्यात आले होते. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी उपस्थित होते. दररोज योगासने केल्यामुळे मानवी शरीराला चांगला फायदा होतो. शरीर निरोगी राहते नियमित योग करणाऱ्या व्यक्तिला कुठलाही त्रास होत नाही. लहान मुलांपासून ते वयोवृद्धापर्यंत कुठलाही व्यक्ती योग करू शकतो. आणि याचा निश्चितपणे फायदा होतो असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील यांनी याप्रसंगी केले. महाविद्यालयातील उपस्थित प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांना योग अभ्यासक समीर गणविर व संच यांनी प्रत्याक्षिक करून घेत त्यासंबंधी माहिती दिली. या कार्यक्रमाला डॉ. रत्नदीप सावंत, डॉ. दीपा पान्हेकर, उपप्राचार्या डॉ. प्रतिभा सिरीया, डॉ.शैलेश बहादुरे, डॉ. वझलवार प्रामुख्याने उपस्थित होते. प्रास्ताविक रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपूडे व आभार डॉ. दीपक बोरकर यांनी केले.



## 'योगासनांमुळे शरीर सुदृढ होते'

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील यांच्या अध्यक्षतेत आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा विभागातर्फे महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे प्रामुख्याने उपस्थित होते. 'दररोज योगासने केल्यामुळे मानवी शरीराला चांगला फायदा होतो. शरीर निरोगी राहते नियमित योग करणाऱ्या व्यक्तीला कुठलाही त्रास होत नाही. लहान मुलांपासून ते वयोवृद्धापर्यंत कुठलाही व्यक्ती योग करू शकतो. आणि याचा निश्चितपणे फायदा होतो', असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. रत्नदीप सावंत, डॉ. दीपा पान्हेकर, उपप्राचार्या डॉ. प्रतिभा सिरीया, डॉ.शैलेश बहादुरे, डॉ. वझलवार प्रामुख्याने उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. दीपक बोरकर यांनी केले.

## डॉ. आंबेडकर महाविद्यालय



डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालयातील क्रीडा विभागातर्फे करण्यात आले होते. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए. पी. जोशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे प्रामुख्याने उपस्थित होते. दररोज योगासने केल्यामुळे मानवी शरीराला चांगला फायदा होतो. शरीर निरोगी राहते. नियमित योग करणाऱ्या व्यक्तीला कुठलाही त्रास होत नाही. लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत कुठलाही व्यक्ती योग करू शकतो. याचा निश्चित फायदा होतो, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य पाटील यांनी याप्रसंगी केले. महाविद्यालयातील उपस्थित प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांना योग अभ्यासक समीर गणवीर व संच यांनी प्रात्यक्षिक करून घेत त्यासंबंधीची माहिती दिली. या कार्यक्रमाला डॉ. रत्नदीप सावंत, डॉ. दीपा पान्हेकर, उप्राचार्या डॉ. प्रतिभा सिरिया, डॉ. शैलेश बहादुरे, डॉ. वझलवार प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी कार्यक्रमात सहभागी झाले होते. प्रास्ताविक रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले व आभार डॉ. दीपक बोरकर यांनी मानले.



## डॉ. आंबेडकर महाविद्यालयात रासेयोतर्फे वृक्षारोपण

नागपूर : 'निसर्गामुळेच मानवी जीवनचक्र अबाधीत आहे. त्यामुळे निसर्गातील महत्त्वाचा घटक असलेल्या वृक्षांना प्रत्येकाने आपल्या मुलाप्रमाणे-मित्राप्रमाणे जपले पाहिजे. प्रत्येक वृक्षाची काळजी घेत निसर्गातील समतोल कायम राखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत', असे प्रतिपादन दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील यांनी केले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने बुधवारी महाविद्यालय परिसरात आयोजित वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य प्रा. पाटील, उपप्राचार्या डॉ. प्रतिभा सिरिया, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संबोधित करताना उपप्राचार्या डॉ. प्रतिभा सिरिया यांनी विद्यार्थ्यांना वृक्षलागवडीचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाधिकारी डॉ. तिरपुडे यांच्या मार्गदर्शनात वृक्षदिंडी काढून महाविद्यालय परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. तिरपुडे यांनी केले, तर डॉ. रत्नदीप सावंत यांनी आभार मानले. वृक्षारोपण कार्यक्रमात रासेयोच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवित वृक्षसंवर्धनाचे दूत बनण्याचा संकल्प केला.




नागपूर : दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या रासेयो विभागातर्फे आयोजित वृक्षदिंडीत सहभागी प्राचार्य आर. व्ही. पाटील, डॉ. प्रतिभा सिरिया, डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत आदी.

## डॉ. आंबेडकर महाविद्यालयात वृक्षारोपण

**नागपूर :** निसर्गामुळेच मानवी जीवनचक्र अबाधित आहे. त्यामुळे निसर्गातील महत्त्वाचा घटक असलेल्या वृक्षांना प्रत्येकाने आपल्या मुलाप्रमाणे-मित्राप्रमाणे जपले पाहिजे. प्रत्येक वृक्षाची काळजी घेत निसर्गातील समतोल कायम राखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील यांनी केले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने बुधवारी महाविद्यालय परिसरात आयोजित वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य प्रा. पाटील, उपप्राचार्या डॉ. प्रतिभा सिरिया, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संबोधित करताना उपप्राचार्या डॉ. प्रतिभा सिरिया यांनी विद्यार्थ्यांना वृक्षलागवडीचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाधिकारी डॉ. तिरपुडे यांच्या मार्गदर्शनात वृक्षदिंडी काढून महाविद्यालय परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. तिरपुडे यांनी केले. डॉ. रत्नदीप सावंत यांनी आभार मानले. वृक्षारोपण कार्यक्रमात रासेयोच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवित वृक्षसंवर्धनाचे दूत बनण्याचा संकल्प केला.

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयात वृक्षारोपण

**लोकशाही वार्ता/नागपूर**

निसर्गामुळेच मानवी जीवनचक्र अबाधित आहे. त्यामुळे निसर्गातील महत्त्वाचा घटक असलेल्या वृक्षांना प्रत्येकाने आपल्या मुलाप्रमाणे-मित्राप्रमाणे जपले पाहिजे. प्रत्येक वृक्षाची काळजी घेत निसर्गातील समतोल कायम राखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील यांनी केले.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने बुधवारी महाविद्यालय परिसरात आयोजित वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य प्रा. पाटील, उपप्राचार्या डॉ. प्रतिभा सिरिया, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संबोधित करताना उपप्राचार्या डॉ. प्रतिभा सिरिया यांनी विद्यार्थ्यांना वृक्षलागवडीचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाधिकारी डॉ. तिरपुडे यांच्या मार्गदर्शनात वृक्षदिंडी काढून महाविद्यालय परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

प्रास्ताविक डॉ. तिरपुडे यांनी केले. तर डॉ. रत्नदीप सावंत यांनी आभार मानले. वृक्षारोपण कार्यक्रमात रासेयोच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवित वृक्षसंवर्धनाचे दूत बनण्याचा संकल्प केला.

नव राष्ट्र

# पु.ल. देशपांडे जन्मशताब्दीनिमित्त 'स्टॅण्ड अप कॉमेडी' स्पर्धा 30 ला

नागपूर. मराठी भाषा विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय तसेच सोनी मराठी वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील प्रतिभावंत कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी व पु.ल. देशपांडे यांचे विचार रुजविण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे 'स्टॅंड अप कॉमेडी' स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यात 30 जुलै रोजी डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी येथे ही स्पर्धा होणार आहे. तसेच राज्यातील 36 जिल्ह्यात ही स्पर्धा आयोजित केली असून महाराष्ट्रातील विनोदी कलावंतांचे टॅलेंट हंट करण्याचा प्रयत्न राज्य शासन करणार आहे. प्रत्येक केंद्रावरील विजेत्यांना वीस हजार रुपये आणि उपविजेत्याला पंधरा हजार रुपये रोख स्वरुपाची बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रत्येक केंद्रावर सकाळी 10 ते दुपारी 2 व दुपारी 3 ते सायं. 7 या स्पर्धेचे आयोजन होणार आहे. इच्छुक स्पर्धकांनी आपल्या कार्यक्रम स्थळाजवळील वेळापत्रकाप्रमाणे एक दिवस अगोदर 7506848055 या व्हॉट्सॲप क्रमांकावर दोन मिनिटांचे सादरीकरण चित्रित करुन पाठवायचे आहे. यातून निवड करण्यात आलेल्या स्पर्धकाला केंद्रावर 5 व 8 मिनिटे सादरीकरण करावयाचे आहे.

## उपक्रमाचे प्रक्षेपण मराठी वाहिनीवरून

"विनोद हा पुलंच्या साहित्याचा अविभाज्य भाग आहे. पुलंचे साहित्य अधिकाधिक तरुणांपर्यंत पोहोचावे, यासाठी ही स्पर्धा सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित केली आहे. या स्पर्धेदरम्यान सर्व जिल्हा केंद्रावर पु.ल. जत्रोत्सवही आयोजित करण्यात येणार आहे. या माध्यमातून पुलंचे साहित्य, त्यांची भाषणे, त्यांचे कार्यक्रम अनुभवण्याची संधीही रसिकांना मिळणार आहे. या संपूर्ण उपक्रमाचे प्रक्षेपण सोनी मराठी वाहिनीवरुन केले जाणार असून कलावंतांची कला महाराष्ट्रभर पोहोचावी, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रातील शहरी तसेच ग्रामीण भागातील विनोदी कलावंतांना राज्यस्तरीय व्यासपीठ देण्याच्या हेतूने ही स्पर्धा राबवण्यात येत आहे.

Navarashtra Orange City Plus Edition
20 July, 2019 Page No. 4

# पु. लं. देशपांडे स्टॅंडअप कॉमेडी स्पर्धेची प्राथमिक फेरी ३० ला

लोकशाही वार्ता/ नागपूर

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तीमत्व पु. ल. देशपांडे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष असून, राज्य शासनामार्फत पुलंच्या जन्मशताब्दी निमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. याच उपक्रमांर्गत पुल यांच्या साहित्यावर आधारित स्टॅंड अप कॉमेडी स्पर्धेचे आयोजन राज्यात केले जाणार आहे. नागपूर जिल्ह्यासाठी डॉ. आंबेडकर महाविद्याल दीक्षाभूमी येथे ३० जुलै रोजी प्राथमिक फेरी होणार असून, समन्वयक म्हणून प्रा.डॉ. रवींद्र तिरपुडे यांची निवड करण्यात आली आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत ही स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक केंद्रांवर पात्र ठरणाऱ्या निवडक विजेत्यांना स्पर्धेच्या अंतिम फेरीत सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे. महाराष्ट्रातील विनोदी कलावंतांचे टॅलेंट हंट करण्याचा प्रयत्न या स्पर्धेच्या निमित्ताने राज्य शासन करणार आहे. विदर्भात बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव येथील जी. एस. महाविद्यालयात २४ जुलै रोजी, अमरावती येथील श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात २८ जुलै रोजी, भंडारा येथील जे. एम. पटेल महाविद्यालयात १ ऑगस्ट रोजी, गडचिरोली येथील शिवाजी महाविद्यालयात ५ ऑगस्ट रोजी, वर्धा येथील यशवंत महाविद्यालयात ९ ऑगस्ट रोजी, तर वाशीम येथील आर. ए. महाविद्यालयात १३ ऑगस्ट रोजी या स्पर्धेची प्राथमिक फेरी होणार आहे.

या स्पर्धेच्या जिल्हास्तरीय फेऱ्यांना सुरुवात होत असून, प्रत्येक केंद्रावरील विजेत्याला २० हजार आणि उपविजेत्याला १५ हजार रुपयांची रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक केंद्रावर सकाळी १० ते दुपारी २ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत ही स्पर्धा होईल. इच्छुक स्पर्धकांनी ७५०६८४८०५५ या व्हॉट्सॲप क्रमांकावर २ मिनिटांचे सादरीकरण चित्रित करून पाठवायचे आहे. यातून निवड करण्यात आलेल्या स्पर्धकाला केंद्रावर ७ ते ८ मनिटे सादरीकरण करावयाचे आहे. या स्पर्धेची सुरुवात दि. १६ जुलैपासून नाशिक येथून सुरू झाली असून, स्पर्धेचा सोहळा २५ ऑगस्ट रोजी पुणे येथील गणेश कला क्रीडा मंच येथे रंगणार आहे.

विनोद हा पुलंच्या साहित्यांचा अविभाज्य भाग आहे. समाजातील माणसांच्या वृत्तींवर आपल्या खुमासदार शैलीत पुलंनी कायम भाष्य केले. स्टॅंड अप कॉमेडी ही स्पर्धादेखील अशाच स्वरुपाची होणार आहे. एखाद्या वृत्तीवर, माणसाच्या स्वभावावर दैनंदिन व्यवहारी जीवनात घडणाऱ्या प्रसंगांवर मिश्कील टिप्पणी करत त्यातील विनोद सर्वांसमोर आणण्याचा प्रकार अनेक स्टॅंड अप कॉमेडियन करतात. सध्या तरुणाईत हा प्रकार अत्यंत लोकप्रिय होत आहे. याच धर्तीवर पुलंचे साहित्य अधिकाधिक तरुणांपर्यंत पोहोचावे, यासाठी ही स्पर्धा सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित केली आहे. या स्पर्धेदरम्यान सर्व जिल्हा केंद्रांवर पु.ल. जत्रोत्सवही आयोजित करण्यात येणार आहे.

# 'पुलं'च्या स्टॅण्डअप कॉमेडीत नागपूरची शिल्पा प्रथम

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ३० : महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचनालयाने पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यावर आधारित 'स्टँड अप कॉमिडी' स्पर्धेत नागपूर केंद्रातून शिल्पा शाहीरला प्रथम तर निशांत अजबेले यास द्वितीय क्रमांक पटकावला.

शिल्पाने 'ती फुलराणी' नाटकातील मंजुळा साकारली तर 'तुम्हाला कोण व्हायचंय आहे मुंबईकर, नाशिककर की नागपूरकर?' संहितेतील पात्र निशांतने साकारले होते. पु.ल. देशपांडे यांच्या बहुरंगी, बहुढंगी व्यक्तिमत्त्वाने नेहमीच मराठी रसिकांना भुरळ घातली. 'म्हैस', 'अंतु बरवा', 'बटाट्याची चाळ' या कलाकृतीस रसिकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले.

इतकेच नव्हे तर 'ती फुलराणी'तील लोभस दिसणाऱ्या मंजुळेच्या हीशी प्रेक्षक प्रेमातही पडले आहेत. याचीच आठवण मंगळवारी झाली. गोऱ्या गोऱ्या गालावर अलगद ठेवलेला काळ्या फ्रेमचा चष्मा अन् वेणीला गुलाबाली फुले लावून आलेल्या मंजुळेस बघून महाविद्यालयातील असंख्य विद्यार्थ्यांच्या भुवया उंचावल्या.

स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ अभिनेते देवेंद्र दोडके, शशांक येवले व डॉ. सतीश पावडे यांनी केले. याप्रसंगी दीक्षाभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्ही. पाटील उपस्थित होते.

या संपूर्ण स्पर्धेचे प्रक्षेपण एका खासगी मराठी वाहिनीवरून केले जाणार असून, कलावंतांची कला महाराष्ट्रभर पोहोचवण्यात येणार आहे. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रातील शहरी; तसेच ग्रामीण भागातील विनोदी कलावंतांना राज्यस्तरीय व्यासपीठ देण्याच्या हेतूने ही स्पर्धा राबवण्यात येत असल्याचे राज्याच्या सांस्कृतिक विभागाकडून सांगण्यात आले आहे.



## डॉ. आंबेडकर कॉलेजमध्ये रंगली 'स्टॅण्ड अप कॉमेडी'

नागपूर : डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील दादासाहेब कुंभारे सभागृहात महाराष्ट्राचे लाडके लेखक पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'स्टॅण्ड अप कॉमेडी' स्पर्धा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील होते, तर परीक्षक म्हणून अभिनेता देवेंद्र दोडके, नाट्य अभिनेता व दिग्दर्शक शशांक केवले, सतीश पावडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे आयोजक व नागपूर जिल्ह्याचे समन्वयक प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे यांचीही यावेळी उपस्थिती होती. या स्पर्धेत सहभागी स्पर्धकांनी पुलंच्या साहित्यावर आपल्या अभिनयाद्वारे 'स्टॅण्ड अप कॉमेडी' कॉमेडी प्रस्तुत केली. नागपूरची शिल्पा शाहीर हिने विजेतपद पटकावले, तर निशांत अजबेले उपविजेते ठरले. माहिती संचालनालयाचा श्रीमती तेलंग यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे वितरित करण्यात आली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व नागपूर जिल्ह्यातील विविध भागांतून आलेले स्पर्धक, नागरिक व महाविद्यालयाचे विद्यार्थी असे जवळपास चारशे प्रेक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. जलदा ढोके यांनी, तर आभार प्रदर्शन यांनी श्रीमती तेलंग यांनी केले.

# पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त रंगली स्टेण्डअप कॉमेडी स्पर्धा

### शिल्पा शाहीर प्रथम, तर निशांत अजबेले उपविजेता

नागपूर : महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त नुकतीच स्टँडअप कॉमेडी स्पर्धा आयोजित करण्यात आली. डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या दादासाहेब कुंभारे सभागृहात ही स्पर्धा घेण्यात आली. विनोद हा पुलंच्या साहित्याचा अविभाज्य भाग आहे. व्यक्तीच्या वृत्तीवर आपल्या खुमासदार शैलीत पुलंनी कायम भाष्य केले. स्टँडअप कॉमेडीसुद्धा अशाच स्वरूपात पार पडली. स्पर्धेत सहभागी स्पर्धकांनी पुलंच्या साहित्यावर आपल्या अभिनयाद्वारे स्टँडअप कॉमिडी सादर केली.

आपल्या अध्यक्षीय संबोधनातून महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील यांनी पुलंच्या प्रवासवर्णनावर भाष्य केले.



पुलंचे साहित्य म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या वृत्तीवर, स्वभावावर, दैनंदिन व्यवहारिक जीवनात घडणाऱ्या प्रसंगावर टिप्पणी करून त्यातील विनोद पुढे आणणारा असायचा. कार्यक्रमाला परीक्षक म्हणून अभिनेता देवेंद्र दोडके, नाट्य अभिनेता व दिग्दर्शक शशांक केवले, सतीश पावडे, परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे, कार्यक्रमाचे आयोजक व नागपूर जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे उपस्थित होते. स्पर्धेत शिल्पा शाहीर ही प्रथम विजेता तर निशांत अलबेले उपविजेता ठरला. माहिती संचालनालयातील तेलंग यांच्या हस्ते विजेत्यांना रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, स्पर्धक, नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. जलदा ढोके यांनी केले.

**नव राष्ट्र**

## लेखन, काव्य व संगीत कार्यशाळांचे आज उद्घाटन

नागपूर. राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत ज्येष्ठ संगीतकार व गायक सुधीर फडके, विख्यात कवी, पटकथा, संवाद, लेखक व गीतकार ग. दि. माडगूळकर आणि ख्यातनाम साहित्यिक, नाट्य व चित्रपट अभिनेते पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांत लेखन, काव्य व संगीत कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री विनोद तावडे यांच्या संकल्पनेतून राज्यभरात शंभर कार्यशाळा आयोजित करायच्या असून गतवर्षी त्यापैकी 55 महाविद्यालयात या कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. उर्वरित 45 कार्यशाळांचे आयोजन येत्या 19 ऑगस्टपासून नागपूर येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयातून करण्यात येत आहे. 20 ऑगस्ट रोजी नागपूरच्या सी.पी. अँड बेरार कॉलेजमध्ये या दिवसभराच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. लेखन, काव्य व संगीत या क्षेत्रात आवड असलेल्या विद्यार्थ्यांनी त्वरित संबंधित महाविद्यालयात संपर्क करुन आपला सहभाग निश्चित करावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य प्र. संचालक मीनल जोगळेकर यांनी केले आहे.

Navarashtra Orange City Plus Edition
19 Aug, 2019 Page No. 4

**लोकमत**

## काव्य, संगीत, लेखनवर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी येथे सांस्कृतिक संचालनालयातर्फे काव्य, संगीत, लेखन या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

सांस्कृतिक कार्यसंचालनालयाच्या संचालक मीनल जोगळेकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.व्ही. पाटील होते. कार्यशाळेचे समन्वयन प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. व्यासपीठावर विभागीय सहसंचालक अल्का तेलंग, मार्गदर्शक विजय उतेकर, कस्तुरी पायगुडे, रवींद्र सातफळे, निकिता भागवत, आनंद क्षेमकल्याणी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. संचालन डॉ. रत्नदीप सावंत यांनी केले. तर आभार अल्का तेलंग यांनी मानले.

Hello Nagpur
Page No. 7 Aug 22, 2019
Powered by: erelego.com

# डॉ . आंबेडकर महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळा

लोकशाही वार्ता / नागपूर

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथे काव्य, संगीत, लेखन या विषयावर सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन आणि डॉ. आंबेडकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन सांस्कृतिक कार्यसंचालनालयाच्या संचालिका मिनल जोगळेकर यांच्या हस्ते पार पडले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील होते. कार्यशाळेचे समन्वयक प्रा. डॉ. रविंद्र तिरपुडे, अलका तेलंग, संगीत , काव्य आणि लेखन या विषयावर मार्गदर्शन करण्याकरिता आलेले विजय उतेकर, कस्तुरी पायगुडे, रविंद्र सातफळे, निकिता भागवत आणि आनंद क्षेमकल्याणी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यशाळेत संगती, लेखन आणि काव्य याविषयावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा .रविंद्र तिरपुडे यांनी केले. संचालन डॉ. रत्नदीप सावंत यांनी केले. आभार अल्का तेलंग यांनी मानले.

## विद्यार्थ्यांची विनोबा आश्रमाला भेट



लोकशाही वार्ता / नागपूर

डॉ . आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा ता.९ सप्टेंबर रोजी काढण्यात आला. वर्धा येथील सेवाग्राम, गांधी आश्रम, विनोबा भावे आश्रम शांती स्तूप येथे विद्यार्थी भेट देतील. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे व तथागत गौतम बुध्द यांचे विचार आत्मसात करून जीवनात समता, स्वातंत्र्य , बंधुता व सामाजिक जाणीव निर्माण व्हावी तसेच सत्य, अहिंसा व शांतीच्या मार्गाचा अवलंब करून जीवन अधिक समृद्ध करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे हाच उद्देश डोळ्यापुढे ठेवून या सहलीचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रविंद्र तिरपुडे व सह कार्यक्रम अधिकारी डॉ .रत्नदीप सावंत यांनी केले महाविद्यालयाचे प्राचार्य आर . व्ही . पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत सहलीसाठी रवाना केले.विद्यार्थ्यांनी या सहलीत आपला सहभाग नोंदविला होता.सेवाग्राम येथील बापू आश्रमातील इतर माहिती तिथल्या स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांना दिली.यावेळी गांधीजींच्या आश्रमातील वास्तव्या संबंधीची व त्यांनी वापरलेल्या वस्तुसंबंधी माहिती जाणून घेतली.

## डॉ. आंबेडकर कॉलेजच्या रासेयो पथकाचा दौरा



**नागपूर:** डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकातील विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा वर्धा येथील सेवाग्राम, गांधी आश्रम, विनोबा भावे आश्रम व शांतिस्तूप याठिकाणी नुकताच काढण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांनी महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे व तथागत गौतम बुद्धांचे विचार आत्मसात करून जीवनात समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, तसेच सत्य, अहिंसा व शांतीच्या मार्गाचा अवलंब करून जीवन अधिक समृद्ध करावे, असे आवाहन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रवींद तिरपुडे व सहकार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नदीप सावंत यांनी केले. जवळपास ११० विद्यार्थ्यांनी या सहलीत सहभाग नोंदविला. सेवाग्राम बापू आश्रमातील माहिती तेथील स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांना दिली. त्यानंतर सायंकाळी हा दौरा आश्रमाचा निरोप घेऊन नागपूरला परतला.

## आंबेडकर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची सेवाग्राम भेट

नागपूर : डॉ. आंबेडकर कॉलेज येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांचा अभ्यास दौरा वर्धा येथील सेवाग्राम, गांधी आश्रम, विनोबा भावे आश्रम व शांती स्तूप येथे काढण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे व तथागत गौतम बुद्ध यांचे विचार आत्मसात करावे हाच उद्देश डोळ्यापुढे ठेऊन या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे व सह-कार्यक्रम अधिकारी डॉ. रत्नदीप सावंत यांनी केले. कॉलेजचे प्राचार्य आर. व्ही पाटील यांनी विद्यार्थांना शुभेच्छा दिल्या. ११० विद्यार्थांनी या सहलीत सहभागी झाले होते.



तरुण भारत

Nagpur Edition | 2019-09-10 | Page- 2

## रासेयो विद्यार्थ्यांची सेवाग्राम आश्रमास भेट



दीक्षाभूमीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा पवनारचा विनोबा भावे आश्रम, सेवाग्रामचा गांधी आश्रम येथे आयोजित करण्यात आला. प्राचार्य आर. व्ही. पाटील यांनी विद्यार्थ्यांना रवाना केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. रत्नदीप सावंत यांनी आयोजन केले.

Powered by Bharati Web Pvt Ltd

TheHitavada

Nagpur City Line | 2019-09-15 | Page- 7

## Dr Ambedkar College, Deekshabhoomi



NSS students with college authorities during the visit.

NSS students of Dr Ambedkar College, Deekshabhoomi, visited Sevagram, Gandhi Ashram, Vinoba Bhave Ashram and *Shanti Stup* Wardha. NSS students understood the thoughts of Mahatma Gandhi, Aacharya Vinoba Bhave and Tathagat Gautam Buddha. Moreover, students desired to follow the truth, non-violence and way of peace for making life successful. Programme Officer Dr Ravindra Tirpude and Co-programme Officer Dr Ratnnadeep Sawant organised the study tour. Nearly, 110 students participated for the tour. The volunteers of Gandhi ashram provided the exact details of the sevagram to the NSS students.

Powered by Bharati Web Pvt Ltd

## आंबेडकर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केले निर्माल्य गोळा



नागपूर : डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांनी सोनेगाव तलाव येथे गणपती विसर्जनानिमित्त निर्माल्य गोळा करून परिसर स्वच्छतेचे काम केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. रत्नदीप सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांनी निर्माल्य गोळा करून परिसर स्वच्छ केला.



### निर्माल्य संकलनात डॉ. आंबेडकर कॉलेजचा सहभाग

नागपूर : दीक्षाभूमी येथील डॉ. अंबिडकर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्य विद्यार्थ्यांनी सोनेगाव तलाव येथे गणपती विसर्जनानिमित्त निर्माल्य संकलनात सहभाग नोंदविला. भविकांतर्फे फेकून देण्यात येणारे निर्माल्य विद्यार्थ्यांनी संकलित करून परिसर स्वच्छ केला. याप्रसंगी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश रासेयेतर्फे देण्यात आल. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. रत्नदीप सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांनी संपूर्ण उपक्रम राबविला.

## डॉ. आंबेडकर महाविद्यालयात तंबाखूविरोधी दिन उत्साहात

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



नागपूर : दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक तंबाखूविरोधी दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य आर.व्ही.पाटील, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. शैलेश बहादुरे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. दीपा पान्हेकर, डॉ.रत्नदीप सावंत उपस्थित होते.

व्यवसनामुळे जिवनात निराशा येते, शारीरिक आणि मानसिक हानी होते. त्यामुळे प्रत्येकाने व्यसनमुक्त व्हावे, असे सांगत प्राचार्य पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांना तंबाखुमुक्त होण्याची शपथ दिली. इतर मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यसनमुक्ती जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

व्यसनाधिनतेविरोधात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पोस्टरच्या माध्यमातून जनजागृती केली.

## जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा

**लोकशाही वार्ता / नागपूर**

डॉ.आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी नागपूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्र माला महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. शैलेश बहादुरे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. दीपा पान्हेकर, डॉ. रत्नदीप सावंत उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना याप्रसंगी प्राचार्य पाटील यांनी व्यसनामुळे जीवनात अनेक समस्या निर्माण होऊन निराशा येते. व्यसन कोणतेही असो त्याचा कधी ना कधी विपरीत परिणाम शरिरावर दिसून येतोच. त्यामुळे प्रत्येकाने आजपासून व्यसनमुक्त व्हायला पाहिजे. याकरीता विद्यार्थ्यांना त्यांनी तंबाखूमुक्त होण्यासाठी शपथ दिली. यावेळी डॉ.दीपा पान्हेकर, डॉ. शैलेश बहादुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन व्यसनमुक्ती जनजागृती करण्यासाठी पथनाट्य देखील सादर केले. पोष्टरच्या माध्यमातून जनजागृती व्हावी याकरिता व्यसनाधीनतेवर विविध विषयांसंदर्भात चित्रे काढण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केले.



**सकाळ**

## डॉ. आंबेडकर महाविद्यालयात व्यसनमुक्तीची शपथ

नागपूर, ता. २२ : राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयात जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. शैलेश बहादुरे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. दीपा पान्हेकर व डॉ. रत्नदीप सावंत उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्ती जनजागृती करण्यासाठी पथनाट्य सादर केले. आर. व्ही. पाटील यांनी विद्यार्थ्यांना व्यसनामुळे होणाऱ्या शारीरिक व मानसिक हानीबद्दल मार्गदर्शन केले. तसेच प्रत्येकाला व्यसनमुक्तीसाठी तंबाखूमुक्त होण्याची शपथ दिली.

Nagpur, Nagpur-Today
23/09/2019 Page No. 8

## विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्त होण्याची शपथ




*प्रतिनिधी/१७ सप्टेंबर*

**नागपूर :** डॉ.आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य आर.व्ही. पाटील, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. शैलेंद्र बहादुरे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. दीपा पान्हेकर, डॉ. रत्नदीप सावंत उपस्थित होते. रासेयोच्या विद्यार्थ्यांना याप्रसंगी प्राचार्य आर.व्ही. पाटील यांनी व्यसनामुळे जीवनात अनेक निराशा येते, एवढेच नाहीतर शारीरिक, मानसिक हानीसुध्दा होते. त्यामुळे प्रत्येकाने आजपासून व्यसनमुक्त व्हायला पाहिजे. याकरिता विद्यार्थ्यांना त्यांनी तंबाखूमुक्त होण्यासाठी शपथ दिली. डॉ.पान्हेकर, डॉ.बहादुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले पोस्टरच्या माध्यमातून जनजागृती व्हावी याकरिता व्यसनाधीनतेवर विविध विषयासंदर्भात चित्रे काढण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन रासेयोच्या स्वयंसेवकांनी केले.

ePaper देशोन्नती Wed, 18 September 2019 https://deshonnati.digitaleditior

# तरुण भारत

Nagpur Edition | 2019-09-18 | Page- 7

## डॉ. आंबेडकर महाविद्यालयात तंबाखू निषेध दिन




डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक तंबाखू निषेध दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य आर. व्ही. पाटील, डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. शैलेश बहादुरे, डॉ. दीपा पान्हेकर व डॉ. रत्नदीप सावंत उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. पथनाट्य, पोस्टर व चित्रे काढून विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्ती जनजागृती केली. सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली. ◂ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web Pvt Ltd

## आंबेडकर कॉलेज में तंबाकू निषेध दिवस कार्यक्रम




तंबाकू निषेध दिवस पर शपथ लेते अतिथि, शिक्षक व विद्यार्थी.

**नागपुर :** दीक्षाभूमि स्थित डॉ. आंबेडकर कॉलेज में राष्ट्रीय सेवा योजना विभाग के तत्वावधान में विश्व तंबाकू निषेध दिवस पर कार्यक्रम का आयोजन किया गया. प्रमुख रुप से महाविद्यालय के प्राचार्य आर.वी. पाटिल, कार्यक्रम अधिकारी डॉ. रविंद्र तिरपुड़े, डॉ. शैलेष बहादुरे, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपा पान्हेकर, डॉ. रत्नदीप सावंत उपस्थित थे. इस दौरान डॉ. दीपा पान्हेकर, डॉ. शैलेष बहादुरे ने तंबाकू से होने वाले नुकसान से विद्यार्थियों को अवगत कराया. विद्यार्थियों ने पथनाट्य से व्यसनमुक्ति पर जनजागृति का संदेश दिया.

## 'आदर्श समाजासाठी हवेत बाबासाहेबांचे विचार'




नागपूर : जीवनाचे ध्येय निश्चित करण्यासाठी कुणाच्या तरी प्रेरणेची आवश्यकता असते. पवित्र दीक्षाभूमीवर सामाजिक क्रांती घडविणाऱ्या डॉ. आंबेडकर यांना आपले आदर्श मानले पाहिजे असे मत डॉ. नरेंद्र भुसारी यांनी व्यक्त केले. दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५०व्या स्थापना दिवसाच्या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. शैलेश बहादुरे, डॉ. रत्नदीप सावंत व्यासपीठावर उपस्थित होते. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत:मध्ये सेवाभाव निर्माण करणे गरजेचे आहे. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांनी दिलेला मंत्र प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या जीवनात अंगिकारला पाहिजे. डॉ. तिरपुडे यांनी रासेयोबाबत विद्यार्थ्यांनी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी मानवता, बंधुता याचा अंगिकार करून देशाला समृद्ध बनवावे असे आवाहन केले. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे ३०० विद्यार्थी आणि महाविद्यालयातील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन निखिल मोटघरे यांनी केले तर अमिशा शेगावकर यांनी आभार मानले.

# तरुण भारत

Nagpur Edition | 2019-10-04 | Page- 2

## आदर्श समाजासाठी डॉ. आंबेडकरांचे विचार स्वीकारा




◆ **नागपूर, ३ ऑक्टोबर**

मी माझ्या जीवनाचा शिल्पकार आहे आणि मला माझ्या जीवनाचे ध्येय निश्चित करण्याचा अधिकार आहे. परंतु, हे ध्येय निश्चित करण्यासाठी कुणाच्या तरी प्रेरणेची आवश्यकता असते. समाजातील थोर विचारवंतांचे विचार व जीवनात आलेले चांगले वाईट अनुभव हे आयुष्याला परिपक्व करण्याचे काम करते. त्याकरिता प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत:मध्ये सेवा भाव वृत्ती निर्माण केली पाहिजे. आपला आदर्श ओळखा व त्यांचे विचार अंगिकारा व आदर्श समाज घडविण्यास हातभार लावा. या पवित्र दीक्षाभूमीवर सामाजिक क्रांती घडविणाऱ्या डॉ. आंबेडकर यांना आपले आदर्श मानले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. नरेंद्र भुसारी यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५० व्या स्थापना दिवसाच्या आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास देशपांडे, रा. से. योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. शैलेश बहादुरे, डॉ. रत्नदीप सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच रा. से. योजनेचे ३०० विद्यार्थी व महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. संचालन निखिल मोटघरे तर आभारप्रदर्शन अमिशा शेगावकर यांनी केले.

Powered by Bharati Web Pvt Ltd

# विद्यापीठ स्तरीय लोकशाहीचा जागर नाट्य स्पर्धा

## नरेंद्र तिडके महाविद्यालयात आयोजन



# विद्यापीठस्तरीय 'लोकशाहीचा जागर' नाट्य स्पर्धा

**जनजागृती**

## विविध जिल्ह्यातील १३० विद्यार्थ्यांचा स्पर्धेत सहभाग

**शहर प्रतिनिधी / १९ ऑक्टोबर**

**रामटेक : नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय रामटेक, विभागीय प्रशासन रामटेक महाराष्ट्र शासन व राष्ट्रीय सेवा योजना, रातुम नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ऑक्टोबरला मतदान जागृतीसाठी 'लोकशाहीचा जागर' या विषयावर विद्यापीठस्तरीय नाट्य स्पर्धा नुकतीच संपन्न झाली.**



Sun, 20 October 2019
https://deshonnati.digitaledition.in/c/44879114

# संविधानामुळेच भारत एकसंघ : डॉ. फुलझेले

**पुण्य नगरी / प्रतिनिधी**



नागपूर : आज भारत देश एकसंघ आहे, तो संविधानामुळेच. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात, समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्याय या मूल्यांची पेरणी करून जगातल्या सर्वांत सुंदर राज्यघटनेची निर्मिती केली. आज देशात विविध जाती, धर्म, पंथाचे लोक असले तरी सामाजिकदृष्ट्या ते एकसंघ आहेत. विविधतेने नटलेल्या देशात भारतीय संविधान समानमूल्यांची जाणीव करून देते, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य डॉ. सुधीर फुलझेले यांनी केले.


डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने साजरा करण्यात आलेल्या संविधान दिवसाच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, उपप्राचार्य डॉ. के. जी. रेवतकर, डॉ. रत्नदीप सावंत उपस्थित होते. ते म्हणाले, डॉ. आंबेडकर महाविद्यालयात शिक्षण घेणारे विविध जाती, धर्मांचे विद्यार्थी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपले प्रेरणास्रोत मानतात व त्यांनी सांगितलेल्या तत्त्वांचे पालन करतात. आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना प्राचार्य आर. व्ही. पाटील म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिवस-रात्र एक करून जगातील सर्वांत सुंदर भारतीय राज्यघटनेची निर्मिती करून दिली. त्यांनी या संविधानात समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक माणसाला आपले विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ या भारतीय राज्यघटनेने दिले आहे. यानंतर प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी राज्यघटनेच्या प्रस्ताविकेचे वाचन केले.

प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. सूत्रसंचालन निखिल मोटघरे यांनी केले तर आभार अंकित मालखेडे यांनी मानले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तरुण भारत**

Apla Nagpur | 2019-12-04 | Page- 7

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात संविधन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील होते. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, उपप्राचार्य डॉ. के. जी. रेवतकर, डॉ. रत्नदीप सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन निखिल मोटघरे तर आभार अंकित मालखेडे यांनी मानले.

Powered by Bharati Web Pvt Ltd

## डॉ. आंबेडकर महाविद्यालय



आज देशात विविध जाती धर्म, पंथाचे लोक असले तरी सामाजिक दृष्ट्या ते एकसंघ आहेत. विविधतेने नटलेल्या देशात भारतीय संविधान समानमूल्याची जाणीव करून देते, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य डॉ. सुधीर फुलझेले यांनी केले. डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने संविधानदिन साजरा करण्यात आला त्याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, उपप्राचार्य डॉ. के. जी. रेवतकर, डॉ. रत्नदीप सावंत उपस्थित होते. यानंतर सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी राज्यघटनेच्या प्रस्ताविकेचे वाचन केले. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे, संचालन निखिल मोटघरे यांनी तर आभार अंकित मालखेडे यांनी मानले.

Thu, 28 November 2019
https://deshonnati.digitaledition.

# मी तरुण आहे पण नादान नाही

**सल्ला** — डॉ. मिलिंद भ्रुशुंडी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी / २ डिसेंबर

**नागपूर :** लैंगिक संबध ही माणसाची मूलभूत गरज आहे. हे खरे असले तरी लैंगिक संबंधाविषयी आजच्या प्रत्येक विद्यार्थ्याला जागृत असले पाहिजे. विशिष्ट वयोगटातील युवक-युवतींनी लैंगिक शिक्षणाविषयी चर्चा करणे आज गरजेचे आहे. एक एचआयव्ही हा संसर्गजन्य विषाणू आहे आणि हा विषाणू एड्स रोगाला कारणीभूत ठरतो. विद्यार्थ्यांच्या जीवनात आलेल्या नैराश्येतून लैंगिक संबध घडतात. मुलींनी लक्षात ठेवलं पाहिजे मी युवा आहे पण नादान नाही, असे प्रतिपादन मेजर डॉ. मिलिंद भ्रुशुंडी यांनी केले.



दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालय येथे रासेयोच्या वतीने जागतिक एड्स दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आर.व्ही. पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत, एनसीसीचे प्रा. सुजित चव्हाण उपस्थित होते.

स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे यांनी डॉ. आंबेडकर महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली, तर आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना प्राचार्य आर.व्ही. पाटील यांनी एड्स या रोगाविषयी अनेक माणसांच्या मनात गैरसमज निर्माण झालेला आहे. एड्स रोग पसरविण्यासाठी रेल्वे स्टेशन किंवा इतर ठिकाणी बारीक सुई टोचतात, परंतु डॉ. भ्रुशुंडी यांनी सांगितलेल्या गोष्टींमुळे गैरसमज दूर झाले आहे. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे, संचालन डॉ. रत्नदीप सावंत यांनी तर आभार प्रा. सुजित चव्हाण यांनी मानले.

CMYK

ePaper देशोन्नती Tue, 03 December 2019
https://deshonnati.digitaledition.in/c/46443138

# लैंगिक शिक्षणाविषयी आज चर्चेची गरज : डॉ. ब्रुशुंडी

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**नागपूर :** 'एचआयव्ही' हा एक संसर्गजन्य विषाणू आहे आणि हा विषाणू एड्स रोगाला कारणीभूत ठरतो. विद्यार्थ्यांच्या जीवनात आलेल्या नैराश्येतून लैंगिक संबंध घडतात. मुलींनी लक्षात ठेवले पाहिजे मी तरुण आहे, पण 'नादान' नाही. लैंगिक संबंध ही माणसाची मूलभूत गरज आहे. हे खरे असले तरी लैंगिक शिक्षणाविषयी चर्चा करण्याची आज गरज आहे, असे प्रतिपादन मेजर डॉ. मिलिंद ब्रुशुंडी यांनी केले.

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक एड्स दिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत, 'एनसीसी'चे प्रा. सुजीत चव्हाण मंचावर उपस्थित होते. स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे यांनी डॉ. आंबेडकर महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात बोलताना प्राचार्य आर. व्ही. पाटील म्हणाले, एड्स या रोगाविषयी अनेकांच्या मनात गैरसमज निर्माण झालेला आहे.

तरुण भारत
Apla Nagpur | 2019-12-06 | Page- 7

## लैंगिक संबंधांबाबत विद्यार्थ्यांनी जागरूक असावे



◆ **नागपूर, ५ डिसेंबर**

लैंगिक संबंध ही माणसाची मूलभूत गरज आहे. हे खरे असले तरी लैंगिक संबंधांविषयी आज प्रत्येक विद्यार्थ्यांनि जागरूक असलेच पाहिजे. विशिष्ट वयोगटातील तरुण-तरुणींनी लैंगिक शिक्षणावर चर्चा करणे आवश्यक आहे. एचआयव्ही हा संसर्गजन्य विषाणू आहे. आणि हा विषाणू एड्स रोगाला कारणीभूत ठरतो. विद्यार्थ्यांच्या जीवनात आलेल्या नैराश्यातून लैंगिक संबंध घडतात. मुलींनी हे लक्षात ठेवावे की, मी तरुण आहे पण अज्ञानी नाही, असे प्रतिपादन मेजर डॉ. मिलिंद भ्रुशंडी यांनी केले. डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक एड्स दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील तर डॉ. आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत, प्रा. सुजित चव्हाण आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. तिरपुडे यांनी, तर संचालन डॉ. रत्नदीप सावंत व उपस्थितांचे आभार सुजित चव्हाण यांनी मानले.

Powered by Bharati Web Pvt Ltd

TheHitavada
Nagpur City Line | 2019-12-07 | Page- 7

## Dr Ambedkar College



Dr Milind Bhrushundi speaking at the event as resource person.

TODAY, students need to be imparted sex education, expressed Dr Milind Bhrushundi while addressing the gathering during AIDS awareness programme organised by NSS at Dr Ambedkar College. Prof RV Patil, Principal presided over the function. *Param Ppoojya* Dr Babasaheb Ambedkar Smarak Samiti Member Vilas Gajghate, NSS Program Officer Dr Ravindra Tirpude, Dr Ratnnadeep Sawant, Associate NCC Officer Lt Sujit Chavhan were present during the occasion. The program was compered by Dr Ravindra Tirpude, conducted by Dr Ratnnadeep Sawant and a vote of the thanks was proposed by Lt Sujit Chavhan.

Powered by Bharati Web Pvt Ltd

# आजची युवापिढी नाटकी वागू शकत नाही!

## प्राचार्य आर .व्ही.पाटील यांचे प्रतिपादन

**लोकशाही वार्ता / नागपूर**

आजची तरुणाई ही देशाची प्रगती व भविष्य आहे. भारतीय संस्कृतीचे जतन करत समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा या गोष्टींना विरोध करून सक्षम देश बनविण्याचे काम आजचा युवक करू शकतो. अनेक लोक या युवकांबद्दल आपले बरे वाईट अनुभव कथन करतात. मात्र,आजची पिढी ही नाटकी वागु शकत नाही, तर खंबीरपणे चुकीचे प्रश्न विचारण्याची हिम्मत दाखवतात, असे प्रतिपादन डॉ.आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य आर.व्ही. पाटील यांनी केले.

डॉ.आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील दादासाहेब कुंभारे सभागृहात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे 'युवा दिवस' साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आर .व्ही . पाटील होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रवींद्र तिरपुडे, डॉ.रत्नदीप सावंत यावेळी उपस्थित होते. प्राचार्य पाटील पुढे म्हणाले, माहिती आणि ज्ञानातील फरक आजच्या तरुणांनी समजावून घ्यायला पाहिजे. माहिती खोटी असू शकते.परंतु, ज्ञान हे खरं असत. आजची युवा पिढी ऊर्जावान आहे. या ऊर्जेला योग्य मार्ग मिळाला, तर निश्चितपणे ही युवापिढी देशाला एक चांगले भविष्य देऊ शकेल.



प्रास्ताविक डॉ.रवींद्र तिरपुडे यांनी केले. प्रास्ताविकेत त्यांनी स्वामी विवेकानंदाच्या साहित्यांचे वाचन तरुणांनी केले पाहिजे. योग्य काय, अयोग्य काय, यातील फरक समजवून घेण्याची गरज आजच्या युवा पिढीला असल्याचे त्यांनी सांगितले.या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांसाठी वकृत्व स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, एकपात्री स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, नृत्य स्पर्धा अशा विविध स्पर्धेचे आयोजन याप्रसंगी करण्यात आले.

याप्रसंगी सरोज भालेराव आणि निखील मोटघरे या दोन्ही स्पर्धकांनी वकृत्व स्पर्धा गाजविली. संचालन चेतना गौतम यांनी तर आभार अंजली गुप्ता हिने मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

**नवराष्ट्र**

# विवेकानंदांचे व्यक्तिमत्त्व तरुणांसाठी प्रेरणादायी

## प्राचार्य आर. व्ही. पाटील यांचे प्रतिपादन



नागपूर. आजची तरुणाई हे देशाचे भविष्य आहे. या तरुणाईने आपल्या ज्ञानाच्या जोरावर देशाला बळकट करण्याचे प्रयत्न केले आहे. स्वामी विवेकानंदांचे व्यक्तिमत्त्व आजच्या तरुणांना प्रेरणादायी आहेत. भारतीय संस्कृती ही महान संस्कृती आहे. या संस्कृतीचे जतन करणे व समजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा या गोष्टींना विरोध करून सक्षम देश बनविण्याचे काम आजचा तरुण करू शकतो. आजची युवा पिढी ही नाटकी वागू शकत नाही तर खंबीरपणे चुकीबद्दल प्रश्न विचारण्याची हिम्मत दाखवतात, असे मत प्राचार्य आर. व्ही. पाटील यांनी व्यक्त केले. डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील दादासाहेब कुंभारे सभागृहात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे युवा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत मंचावर उपस्थित होते. डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी स्वामी विवेकानंदांच्या साहित्याचे वाचन करण्याचा तरुणांना सल्ला दिला.

Orange City Plus Edition
Jan 18, 2020 Page No. 4

**तरुण भारत**

**Apla Nagpur | 2020-01-15 | Page- 4**

# कुंभारे सभागृहात युवा दिन साजरा

◆ **नागपूर, १४ जानेवारी**

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथील दादासाहेब कुंभारे सभागृहात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने युवा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. व्ही. पाटील, तर डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. रत्नदीप सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना पाटील म्हणाले, माहिती आणि ज्ञानातील



फरक आजच्या तरुणांनी समजून घेतला पाहिजे. माहिती खोटी असू शकते पण ज्ञान नेहमी खरेच असते. आजची युवा पिढी ऊर्जावान आहे. या ऊर्जेला योग्य मार्ग मिळाला तर ही पिढी देशाला चांगले भविष्य नक्कीच देऊ शकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. युवा दिनानिमित्त याप्रसंगी विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सरोज भालाधरे व निखिल मोटघरे या विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धा गाजवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतना गौतम तर उपस्थितांचे आभार अंजली गुप्ता यांनी मानले.

◂ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web Pvt Ltd

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयात जलसंवर्धन रॅली




**नागपूर :** डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जलसंवर्धन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या माध्यमातून पाण्याचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी विद्यार्थांनी विविध घोषवाक्यांच्या माध्यमातून जनजागृती केली. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील पाण्याचे महत्त्व विषद करताना म्हणाले की, पाणी मानवी जीवनासाठी किती उपयुक्त आहे. तसेच भविष्यकाळात पाण्याची समस्या मानवाला

भेडसावू नये, यासाठी प्रत्येक माणसाने पाण्याचा योग्य वापर करून जलसंवर्धनाचे काम केले पाहिजे, असा संदेश त्यांनी विद्यार्थांना दिला.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांनी महाविद्यालयाच्या प्रांगणापासून या रॅलीची सुरुवात केली. ही रॅली नागपूर शहरातील काछीपुरा, रामदासपेठ, अशा वस्त्यांमधून लोकांना पाण्याचे महत्त्व पटवून देणाऱ्या घोषणा देत या रॅलीचे समापण दीक्षाभूमी परिसरात करण्यात आले. या रॅलीचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, यांच्या नेतृत्वात करण्यात आले. या रॅलीमध्ये डॉ. भूमी मेहेरे, डॉ. अर्चना मेश्राम, डॉ. रत्नदीप सावंत आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे २०० विद्यार्थी सहभागी झाली होते.

# आंबेडकर महाविद्यालयातर्फे जलसंवर्धन रॅली

**नागपूर** ■ प्रतिनिधी

दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे जलसंवर्धन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीच्या माध्यमातून पाण्याचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध घोषवाक्यांच्या माध्यमातून जनजागृती केली.

प्राचार्य प्रा.आर.व्ही. पाटील पाण्याचे महत्त्व विषद करताना म्हणाले, पाणी मानवी जीवनासाठी उपयुक्त आहे. तसेच भविष्यकाळात पाण्याची समस्या मानवाला हेळसावू नये यासाठी प्रत्येक माणसाने पाण्याचा योग्य वापर करून जलसंवर्धनाचे काम केले पाहिजे, असा संदेशही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.



विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्रांगणापासून रॅलीची सुरुवात केली. ही रॅली शहरातील काछीपुरा, रामदासपेठ, अशा परिसरातून लोकांना पाण्याचे महत्त्व पटवून देणाऱ्या घोषणा देत रॅलीचा समारोप दीक्षाभूमी परिसरात करण्यात आला. रॅलीचे आयोजन रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांच्या नेतृत्वात करण्यात आले. रॅलीत डॉ. भूमी मेहेरे, डॉ. अर्चना मेश्राम, डॉ. रत्नदीप सावंत आणि रासेयोचे २०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

ePaper देशोन्नती
Fri, 31 January 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/48514295

तरुण भारत

Apla Nagpur | 2020-02-03 | Page- 5

# जलसंवर्धन रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद




डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीद्वारा संचालित डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जलसंवर्धन रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीच्या माध्यमातून पाण्याचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध घोषवाक्यांच्या माध्यमातून जनजागृती केली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील यांनी पाण्याचे महत्त्व विशद केले. ही रॅली महाविद्यालयातून निघून काचीपुरा, रामदासपेठ येथून लोकांना पाण्याचे महत्त्व पटवून देणाऱ्या घोषणा देत दीक्षाभूमी परिसरात पोहोचली. याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. भूमी मेहेरे, डॉ. अर्चना मेश्राम, डॉ. रत्नदीप सावंत यांच्यासह २०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

Powered by Bharati Web Pvt Ltd

## नव राष्ट्र

# मुलींनो, सशक्त बना अन् देशाचे नेतृत्व करा

### प्राचार्य आर. व्ही. पाटील यांचे आवाहन

नागपूर. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुढाकाराने स्त्री शिक्षणाला चालना मिळाली. बघता-बघता स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढत गेले आणि याच शिक्षणाच्या जोरावर ती प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करताना दिसत आहे. स्वतःच कुटुंब सांभाळत स्वतःच या कर्तृत्वाने नवेनवे विक्रम ती नावावर करीत आहे. भारतातील अनेक स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाने इतिहास रचला आहे. अशा कर्तबगार स्त्रियांचा आदर्श ठेवून सशक्त बना आणि देशाचे नेतृत्व करण्यासाठी स्वतःला सिद्ध करा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील यांनी केले.डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना व महिला विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महिला विकास मंचच्या डॉ. वर्षा पानबुडे, डॉ. भुवनेश्वरी मेहेरे, डॉ. प्रज्ञा भेलवा, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. वर्षा पानबुडे तर डॉ. भुवनेश्वरी मेहेरे, डॉ. प्रज्ञा भेलवा यांनीही स्त्रियांच्या कर्तबगारीवर प्रकाश टाकला.या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींनी राणी लक्ष्मीबाई, जिजाऊ, रमाई, सावित्री, मदर टेरेसा आदींच्या वेशभूषा परिधान करून महाविद्यालयातून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांच्या नेतृत्वात रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत मोठ्या संख्येने महाविद्यालयातील विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.



कार्यक्रमाचे संचालन डॉ. भुवनेश्वरी मेहेरे यांनी तर आभार डॉ. प्रज्ञा भेलवा यांनी मानले.

Navarashtra Orange City Plus Edition
15 Mar, 2020 Page No. 3



### मुलींनो, देशाचे नेतृत्व करा!

नागपूर : 'भारतातील अनेक स्त्रियांनी आपल्या कामांनी इतिहास रचला आहे. अशा कर्तबगार स्त्रियांचा आदर्श ठेवून स्वतः सशक्त बना आणि देशाचे नेतृत्व करण्यासाठी स्वतःला सिद्ध करा', असे आवाहन दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. पाटील यांनी केले. दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व महिला विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिलादिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला महिला विकास मंचाच्या डॉ. वर्षा पानबुडे, डॉ. भुवनेश्वरी मेहेरे, डॉ. प्रज्ञा भेलवा, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे उपस्थित होते. 'देशात इतिहास घडविणाऱ्या कर्तबगार पुरुषांच्या मागे स्त्रीच होती. जिजाऊ नसत्या तर शिवाजी घडले नसते. सावित्री नसती तर महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षणाचे दालन उघडले नसते. रमाबाई नसत्या तर देशाचे संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर घडू शकले नसते', असेही प्राचार्य पाटील म्हणाले. प्रास्ताविकात डॉ. पानबुडे यांनी कुटुंबाच्या, समाजाच्या विकासात हातभार लावतानाच स्त्री आता देशाच्या विकासासाठीही सज्ज झाली आहे, असे नमूद केले. डॉ. भुवनेश्वरी मेहेरे, डॉ. प्रज्ञा भेलवा यांनीही स्त्रियांच्या कर्तबगारीवर प्रकाश टाकला. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींनी राणी लक्ष्मीबाई, जिजाऊ, रमाई, सावित्रीबाई, मदर टेरेसा यांची वेशभूषा केली होती. महाविद्यालयातून रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या रॅलीत मोठ्या संख्येने महाविद्यालयातील विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. संचालन डॉ. मेहेरे यांनी केले तर डॉ. भेलवा यांनी आभार मानले.

## तरुण भारत

Apla Nagpur | 2020-03-17 | Page- 5

# आंबेडकर महाविद्यालयात महिला दिन



राष्ट्रीय सेवा योजना आणि महिला विकास मंचच्या संयुक्त विद्यमाने दीक्षाभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात महिला दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्राचार्य आर. व्ही. पाटील, महिला विकास मंचच्या वर्षा पानबुडे, डॉ. भुवनेश्वरी मेहेरे, प्रज्ञा भेलवा यांनी महिला दिनावर प्रकाश टाकला. त्यानंतर कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांच्या नेतृत्वात रॅली काढण्यात आली.

Powered by Bharati Web Pvt Ltd